R.N.I. 16775/68 Regd. No. MCW-126/2021-23, Published on 15th of every month



# देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाचार



वर्ष ५६ वे, अंक ७वा, मुंबई । सप्टेंबर २०२३
एकूण पाने २० । प्रती अंक ₹ ५ । वार्षिक वर्गणी ₹ ५०

Year : 56, Issue : 7, Mumbai I September 2023
Total Pages 20 I Price per Issue ₹ 5 I Yearly Subscription ₹ 50





देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण

**समाचार**

वर्ष ५६वे, अंक ७वा,
सप्टेंबर २०२३
(फक्त सभासदांसाठी)

**श्री. विलास जोशी**
अध्यक्ष

**श्री. प्रभाकर कुलकर्णी**
कार्याध्यक्ष

**श्री. प्रसाद ठकार**
कार्यवाह

**श्री. विनोद मांडके**
कोषाध्यक्ष

**संपादक**
**श्री. मिलिंद सरदेशमुख**
मो. : ९८६७९९४३८९

अंकातील मजकूराशी मंडळ
सहमत असेलच असे नाही

दूरध्वनी : २४३०२२७३, २४३०७५७३
ई–मेल : aadrbm@gmail.com
संकेतस्थळ : www.adrbmmahim.in



दे.ऋ.ब्रा.
सोलापूर
संस्थेतर्फे
पुरुषोत्तम याग



श्रावणी, संभाजीनगर




श्रावणी, कल्याण




Visit your nearest IndusInd Bank branch or
Call 1860 267 7777 | 022 4406 6666 | www.indusind.com

/OfficialIndusIndBankPage/ | /indusind_bank/ | /MyIndusIndBank | YouTube /user/IndusIndBank

*T&C Apply. Opening of account with IndusInd Bank is subject to ensuring Know Your Customer documentation and verification.
Kindly read terms and conditions of individual offers furnished at www.indusind.com or visit nearest branch of IndusInd Bank to know further details.


HD FIRE PROTECT
Protecting what matters most to you
World-Class Fire Fighting Products
and Suppression Systems
Serving
75+
Countries
Worldwide
30+
YEARS
OF MANUFACTURING EXCELLENCE
HD FIRE PROTECT PVT. LTD.
Corporate Headquarters: D-6/2, Road No. 34, Wagle Estate, Thane 400604, India
Tel: +(91) 22 21582600 | Fax: +(91) 22 21582602 | Email: info@hdfire.com
VdS
www.hdfire.com | @HdFireProtectPvtLtd | @hd-fire-protect | @TheHdfire

# मनोगत

**विघ्नेश्वराय वरदाय सुरप्रियाय लम्बोदराय सकलाय जगद्धिताय।**
**नागाननाय श्रुतियज्ञविभूषिताय गौरीसुताय गणनाथ! नमो नमस्ते।।**

प्रिय बंधु भगिनींनो,

हा समाारचा अंक आपल्या हातात येईल त्यावेळी आपल्या घरामध्ये श्री गणेश मूर्तीची प्रतिस्थापना झाली असेल. या श्री गणेशाकडे एकच मागणे की, सर्वांना सुखशांती व आनंद मिळो व सर्वांचे आरोग्य निरोगी राहो.


या श्री गणेश चतुर्थीच्या मुहुर्तावर कदाचित भारताच्या नविन सभागृहाचे उद्‌घाटन झाले असेल व या नवीन सभागृहामधील भारताच्या उत्कर्षाच्या अनेक योजनांना मंजूरी मिळून भारत एक जगातील सर्वांगाने बलाढ्य राष्ट्र ओळखले जाईल.

G20 च्या यशस्वी आयोजनामुळे भारताची व आपले यशस्वी पंतप्रधान श्री. नरेंद्रभाई मोदी यांची मान जगात उंचावली आहे. G20 या परिषदेचे अध्यक्षपद भारताकडे आहे आणि परिषदेमध्ये यवसुधैव कुटुंबकमल या ब्रीद वाक्याखाली सर्व जग हा एकच परिवार आहे व सर्व देश एकमेकांच्या सहाय्याने आपसातील वादविवाद मिटवुन आपापली प्रगती करून घेण्याचे काम करणार आहोत. भारत हा देश आता जगामध्ये एक मोठी बाजारपेठ तसेच गुंतवणूक क्षेत्र ओळखला जाणार आहे. तसेच भारतातील पर्यटन स्थळांच्या जगभरातील लोकांना परिचय होत आहे. या निमित्ताने होणाऱ्या दिल्ली येथील G20 परिषदेमध्ये भारतीय संस्कृती, राहणीमान, उत्पादने, खाद्यपदार्थ, पर्यटन स्थळे जी विविध आहेत त्यांच्या एकरुपतेच दर्शन उ२० च्या अध्यक्षांना तसेच प्रतिनिधींना झाले आहे. G20 च्या निमित्ताने एकूण सर्व जागतिक विषयांवर २०० परिषदा भारताच्या वेगवेगळ्या राज्यांमध्ये भरविण्यात आल्या होत्या. त्यामुळे भारताचे निसर्ग सौंदर्य तसेच वेगवेगळ्या विभागातील संस्कृतीचा परिचय G20 निमित्त भरलेल्या जगाच्या २० प्रमुख देशांना झाला आहे. त्यामध्ये आनंदाची बातमी म्हणजे जगातील एक अविकसित परंतू नैसर्गिक स्त्रोतांनी भरलेला असा आफ्रिका समूह G20 मध्ये सामावणार आहे. ज्याची घोषणा आजच आपले लोकप्रिय पंतप्रधान मा. श्री. नरेंद्रजी मोदी यांनी केली आहे. पर्यावरण प्रेमी आणि प्रदूषण मुक्त औद्योगिक धोरण राबविण्याचे नवे संकेत या परिषदेमुळे जगाला प्राप्त होत आहेत. चांद्रयान ३ च्या यशस्वी मोहीमेनंतर अंतराळ क्षेत्रात व संशोधन क्षेत्रात भारताचे स्थान जगातल्या चार राष्ट्रांमध्ये गणले जाऊ लागले आहे. चंद्राच्या दक्षिण भागामध्ये उतरणारे आपले चांद्रयान हे पहिले आंतरिक्ष यान आहे.


श्री गणेश चरणी प्रार्थना की, देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाजाचा भारताच्या प्रगती व उत्कर्षामध्ये सहभाग दिवसेंदिवस वाढत जावो.

।।जय जय रघुवीर समर्थ।।

**प्रभाकर कुलकर्णी**
कार्यवाह



**सर्व सभासद, हिंतचिंतक, देणगीदार, जाहिरातदार,**
**ज्ञातीतील समस्त बंधु-भगिनींना**
**गणेश उत्सवाच्या हार्दीक शुभेच्छा.**



# श्री समर्थांना अभिप्रेत असा गणेशोत्सव

**स. भ. मोहनबुवा रामदासी** (मो. : ९१४६८५५६९१)

**ॐ नमो जि गणनायेका । सर्वसिद्धिफळदायेका ।**
**अज्ञानभ्रांतिछेदका । बोधरुपा ।। १ ।।**
**माझिये अंतरीं भरावें । सर्वकाळ वास्तव्य करावें ।**
**मज वाग्सुंन्यास वदवावें । कृपाकटाक्षेंकरुनी ।। २ ।।** (दासबोध दशक १ समास २)

समर्थ रामदास स्वामी आपल्या श्रीमत ग्रंथराज दासबोधामध्ये गणेशाची स्तुती करतात. त्यात ते असे म्हणतात की, हे गणनायका तू सर्व सिद्धींचे फळ देणार आहेस तू अज्ञान आणि संभ्रम यांचा छेद करणारा आहेस. तू ओंकार स्वरुप आहेस, ज्ञानस्वरुप आहेस तुला नमस्कार असो. माझे अंतकरण तुझ्या वास्तव्याने भरून टाक आणि माझ्यासारख्या मुक्यास तुझ्या कृपाशीर्वादाद्वारे ग्रंथ लिहिण्याची क्षमता दे. अतिशय सुंदर पद्धतीने समर्थ रामदासांनी गणपतीची स्तुती केली आहे, ज्यामुळे आपल्यासमोर गणेशाचे रूप उभे राहते व आपण नतमस्तक होऊन जातो. श्री समर्थांनी रचित गणेशाची आरती, सुखकर्ता दु:खहर्ता सर्वांना परिचित आहेच. श्रीरामाच्या व हनुमंताच्या भक्तीसोबतच समर्थांनी श्री गजाननाची आराधना अत्यंत आवडीने केलेली आहे.

श्री समर्थांना कशा प्रकारचा गणेशोत्सव अभिप्रेत असेल? आज आपण ज्या प्रकारे गणेशोत्सव साजरा करतो तसा गणेशोत्सव त्यांना अभिप्रेत असेल का? हा विचार करण्याची वेळ आता आली आहे. गणपती जो बुद्धीचा देवता व ६४ कलांचा अधिपती समजला जातो त्याचा उत्सवही तसाच असला पाहिजे की, ज्यामुळे माणसाच्या बुद्धीवर चढलेले अज्ञानाचे आवरण छेदले गेले पाहिजे. माणसाच्या मनातील संभ्रमावस्था फिटली पाहिजे. अशा प्रकारचा तो उत्सव असावा. गणेशाची आराधना, भक्ती करताना आपणही एखादी कला शिकून तिच्याद्वारे गणेशाची भक्ती केली असता, ती जास्त चांगल्या प्रकारची आराधना होऊ शकते. आपल्या अंतःकरणात गणेशाची स्थापना करून आपल्या बुद्धीद्वारे योग्य- अयोग्य कृतींची निवड आपल्याला करता आली तर तो खरा गणेशोत्सव साजरा झाला असे म्हणता येईल. आपल्या घरात किंवा आपल्या परिसरात मंडळात जशी आपण गणपतीची स्थापना करतो त्याची मनोभावे पूजा-अर्चना करतो त्याच प्रकारे गणेशाची स्थापना आपण आपल्या हृदयात अंतःकरणात केली पाहिजे. ही गणेश स्थापना फक्त दीड दिवस किंवा दहा दिवस अशी न करता ती कायमस्वरूपी अशी असली पाहिजे तरच खऱ्या अर्थाने गणेश उत्सवा मागचं मर्म आपल्या लक्षात आलं आहे असं म्हणता येईल. गणेश स्थापनेचा हा जो उत्सव आहे, हा केवळ प्रतीक रूपाने आहे. ज्याप्रमाणे गणपतीची स्थापना केल्यानंतर आपल्या घरात आसपासच्या परिसरात एक मंगलमय वातावरण निर्माण होते, एक सकारात्मक ऊर्जा आपल्याला जाणवते त्याच प्रकारे जर आपण आपल्या हृदयात गणपतीची स्थापना करू शकलो तर आपले जीवनसुद्धा सकारात्मक ऊर्जेने आणि चैतन्याने भरून जाईल. ज्याप्रमाणे गणपती स्थापन केल्यानंतर ते दहा दिवस किंवा जो काही स्थापनेचा काळ आहे त्या दिवसांपुरते आपले आचरण एक प्रकारे नियंत्रित होते किंवा शुद्ध होते तशाच प्रकारे आपले आयुष्य नियंत्रित व शुद्ध होऊ शकते.

गणेशाची स्थापना आपल्या मनात करायची म्हणजे नक्की काय करायचं? तर आपल्या अंतःकरणातील सदसदविवेकबुद्धीला जागृत करायचं आपल्या मनातील सकारात्मक शक्तीला प्रेरणा मिळेल अशी कामे

करायची. ज्याप्रमाणे गणपती त्याच्या भक्तांचे अपराध आपल्या पोटात घालतो, त्याप्रमाणे आपणही आपल्या आसपासच्या कुटुंबातील लोकांचे अपराध स्वीकार करायला शिकायचं. ज्याप्रमाणे गणपती सर्वांचे ऐकतो त्याप्रमाणे आपणही सर्वांचे ऐकले पाहिजे. गणपती हा ६४ कलांचा अधिपती आहे त्यामुळे आपणही एखादी कला आत्मसात करून तिच्याद्वारे या ओंकार स्वरूप गणपती ची सेवा किंवा आराधना आपण केली पाहिजे आपल्या कर्मातून देव देश आणि धर्म यांच्यासाठी काहीतरी सत्कार्य घडले पाहिजे असे आपण वागलो तर ती खऱ्या अर्थाने उच्च प्रतीची गणेश आराधना असेल तोच खऱ्या अर्थाने गणेशोत्सव असेल.

## बदलता गणेशोत्सव : एक दृष्टिक्षेप

**प्रदीप जोशी (मो. : ९८८११५७७०९)**

काळाच्या ओघात बदलणे ही मानवी प्रवृत्ती आहे. मात्र हे बदल होत असताना मूळ उद्देश बाजूला जाता कामा नये. कोणत्याही क्षेत्रातील बदल हे स्वागतार्हच असतात. उलट बदल झाला नाही तर तोच तो पणाचा धोका संभवतो. आपले सण उत्सव देखील त्याला अपवाद राहिलेले नाहीत. अगदी गणेशोत्सव साजरा करण्याचे उदाहरण विचारात घ्या. लोकमान्य टिळकांच्या काळातील गणेशोत्सव व आजचा गणेशोत्सव किती तफावत पहावयास मिळते.

लोकमान्यांनी गणेशोत्सव सुरू केला तो एका उदात्त हेतूने. त्यांना स्वराज्यप्राप्ती साठी समाजमन तयार करावयाचे होते. लोकांना संघटित करून त्यांच्यात जागृती निर्माण करावयाची होती. त्या काळात घराबाहेर न पडणाऱ्या लोकांना स्वातंत्र्य चळवळीत भाग घेण्यासाठी प्रवृत्त करावयाचे होते. प्रबोधनातून जनजागृती हा त्यामागचा उद्देश होता. लोकांना एकत्र जमविण्यासाठी त्यांनी गणेशोत्सव सारख्या सणांचा उपयोग करून घेतला. त्यांच्याकडे दूरदृष्टी होती. त्यांनी लोकांना एकत्र करून त्यांच्यात सजीव देखावे माध्यमातून जनजागृती केली.

काळ बदलला. बदलत्या काळानुसार गणेशोत्सव साजरा करण्याचा कल्पना देखील बदलल्या. एक करमणुकीचे आनंदोत्सवाचे साधन म्हणून त्याकडे पाहिले जाऊ लागले. त्यात डॉल्बीचा शिरकाव झाला. ढोल पथक, झांज पथक, लेझीम यांचा गलबला सुरू झाला. आवाजाच्या तीव्रतेने लोकांच्या श्रवण प्रक्रियेवर परिणाम होऊ लागला. त्यासाठी न्यायालयात जाऊन आवाजाची तीव्रता निश्चित करावी लागली. हळूहळू त्यात आता पुन्हा वाढ होऊ लागली.

या दहा दिवसांच्या कालावधीत करमणूक व त्याचबरोबर प्रबोधन हा वसा काही गणेशोत्सव मंडळांनी मात्र अव्याहतपणे जपला आहे. काही ठिकाणी सजीव देखाव्यांच्या माध्यमातून पौराणिक, धार्मिक परंपरा जोपासल्या जात आहेत. साधू संतांची जीवनगाथा समाजासमोर ठेवली जात आहे. डिजिटलायझेशनचा वापर करून अत्याधुनिक तंत्रज्ञान लोकांसमोर आणले जात आहे. हे सारे बदल निश्चित पणे स्वागतार्ह आहेत. त्याबाबत कोणतीही शंका घेण्याचे कारण नाही.

आगमन व विसर्जन मिरवणुकीतील काही प्रकार मात्र टाळले गेले पाहिजेत. गुलाल, चिरमुरे यांची उधळण करणे, मध्यप्राशन करून हिडीस प्रकारचे नाचकाम करणे थांबलेच पाहिजे. यातून समाजासमोर आपण कोणता आदर्श ठेवतो हा खरा प्रश्न आहे. आजकाल गणेशोत्सव राजकारणाच्या गर्तेत सापडत चालला आहे. शक्ती प्रदर्शनाच्या नावाखाली आपण कोणत्या थराला जातो याचे भान काही मंडळींना रहात नाही मग आपल्याच सण उत्सवावर टीकेचा भडिमार होतो. हे टाळता येणे शक्य नाही का?

या काळात सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे रक्तदान शिबिर, आरोग्य तपासणी शिबिर, व्याख्यानमाला, विविध स्पर्धा आदी उपक्रमाचे आयोजन करू शकतात. काही ठिकाणी तसे प्रयत्न देखील सुरू आहेत. गणपती ही विध्येची आराध्य देवता आहे. त्यामुळे आपल्यात सुसंस्कृत पणा आलाच पाहिजे. ठिकठिकाणी गणेशोत्सव मंडळांची रेलचेल करण्यापेक्षा एक गाव एक गणपती ही योजना राबवली गेली पाहिजे. नदी, ओढे, विहिरी येथे गणेशमूर्तीचे विसर्जन पूर्वी केले जायचे. मात्र आजकाल समाजात जागृती निर्माण झाली आहे. गावागावात मोठ्या काहिली ठेवून त्यात गणेश मूर्तीचे विसर्जन केले जाते. त्यामुळे जलप्रदूषण कमी होत आहे. या दहा दिवसांच्या काळात धार्मिक वातावरण तयार झालेले असते. आजकाल सर्वधर्मीय गणेशोत्सव मंडळे पहावयास मिळत आहेत. ऐक्य भावना त्यामुळे वाढीस लागत आहे. गणेशोत्सव साजरा करण्याच्या बाबतीत अगदीच फार मोठा बदल झाला आहे असे नाही. मात्र जो बदल होतोय तो विधायक स्वरूपाचा आहे. सामाजिक बांधिलकी जपणारा, सामाजिक ऐक्य वाढीस लावणारा, लोकजागृती करणारा हा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा झाला पाहिजे. तो होत आहे यातच आपण परंपरा राखण्यात यशस्वी झालो असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही.

आपल्या हिंदू धर्मात प्रत्येक सण उत्सवाचे काही ना काही वैशिष्ट्य आहे. बहुतांशी सण श्रावण महिन्यात असतात. त्यामुळे त्याला एक वेगळेपण लाभले आहे. या सर्व सण उत्सवामागची भूमिका आपण जाणून घेतली तर बरेच काही जीवनात शिकलो असे मानावे लागेल.मोहरमला जसे आज हिंदू मुस्लिम ऐक्याचे प्रतीक मानले जाते तीच भावना गणेशोत्सवाच्या बाबतीत तयार होताना दिसत आहे. मोहरम मध्ये जसा हिंदू धर्मीय लोकांचा सहभाग असतो तसा गणेशोत्सव मध्ये मुस्लिम धर्मियांचा असतो. शेवटी सण समारंभ उत्सव साजरे कशासाठी करायचे तर त्यातून काहीतरी शिकता यावे. काहीतरी बोध घेता यावा. जीवनाला नवी उभारी मिळावी. नवी दिशा मिळावी .

दहा दिवस लोक गणपतीसमोर आरतीसाठी येतात. कधी नव्हे ते जोरजोरात टाळ्या वाजवतात. त्यातून सकारात्मक ऊर्जा आपल्या शरीराला मिळते हा मोठा फायदा नाही का? त्यामुळे गणेशोत्सव स्वरूप कितीही बदलले तरी तो व्यापक प्रमाणात साजरा झाला पाहिजे या मताचा मी आहे. यावर्षी सांगली कोल्हापूर जिल्ह्यात पावसामुळे महापूर आला. सारे जीवनच उध्वस्त झाले. अनेकांचे संसार नष्ट झाले. यापुढील काळात जगायचे कसे ही विवंचना त्यांच्यापुढे निर्माण झाली. अशा परिस्थितीत गणेशोत्सव साध्या पद्धतीने साजरा करून महापुरामुळे विस्थापित झालेल्या कुटुंबाला मदत करणे आपले आद्य कर्तव्य आहे. काही गणेश मंडळांनी त्यादृष्टीने सकारात्मक निर्णय घेतले आहेत. शासनाच्या आवाहनाला प्रतिसाद दिला आहे. शासन स्तरावर ठिकठिकाणी बैठका घेऊन लोकात मतपरिवर्तन केले जात आहे.

## संलग्न संस्था वृत्तांत

**कल्याण** : देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ, कल्याण, पदाधिकारी, सदस्य, हितचिंतक, व मित्र परिवार यांच्या संकल्पनेतून अधिक श्रावण पुरुषोत्तम मासाच्या निमित्ताने आपल्या परिसरातील गरजु आधाराश्रम/ब्राह्मण/ नागरिक यांच्यासाठी अन्नदान निधी जमा करुन त्यांतून आधारवड, कल्याण पश्चिम व मैत्रीकुल संस्था, बाबगांव या दोन संस्थाना तसेच ११ गरजू ब्रह्मवृंद/नागरिकांना पुरेसे अन्नधान्य शिधा रूपात वाटप या आठवड्यात करण्यात आले. त्यांसाठी रविवारी सकाळी मैत्रीकुल संस्थेस संस्था पदाधिकारी / सदस्य / हितचिंतक यांनी सदिच्छा भेट देऊन तेथील परिस्थिती व विद्यार्थी जीवन अनुभवले. त्याची काही क्षणचित्रे सोबत देत आहोत.

या सर्व अन्नदान निधी संकलनात अनेक दानशुरांचे हातभार लागला, त्यासाठी सर्वांचे हार्दिक आभार. असाच हा प्रकल्प पुढे चालू ठेवण्याचा संस्थेचा मानस आहे. या साठी लवकरच संस्था कार्यकारणी निर्णय घेऊन आपणां सर्वांना कळविण्यात येईल. आपल्या सर्वांच्या सहकार्याबद्दल पुनश्च धन्यवाद!

* देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ, कल्याण. यांच्या सामुदायिक श्रावणी च्या आवाहनाला भरघोस प्रतिसाद मिळाला. संस्थेने हे आयोजन ह्यावेळी त्रिविक्रम मंदिर देवस्थान, पारनाका येथे करण्यात आले होते. यावेळी २८ सभासद, हितचिंतक, उत्साहाने उपस्थित होते. अचानक आलेल्या श्रावण सरीमध्ये सव्वा आठ वाजता कार्यक्रमास सुरुवात झाली, हा कार्यक्रम जवळपास ३.३० तास चालला होता, याचे सर्व धर्म विधी पौरोहित्य श्रीमान मोहन जोशी गुरुजी, मंदार संत गुरुजी व त्यांचे स्नेही यांनी केले. यावेळी जोशी गुरुजींनी रोजची संध्या व सूर्याच्या अर्ध्याचे महत्व विशद केले. सर्व विधिवत होमहवन, मंत्रपठणात श्रावणी संस्कार करुन सर्वांनी नवीन जानवे धारण केले, आजच्या कार्यक्रमाचे आयोजन व इतर व्यवस्थेबद्दल आलेल्या सर्वानी समाधान व्यक्त केले.

* देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ, कल्याण, संस्थेच्या हौशी कलाकारांना त्यांच्यातील अंगभूत गायन कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी ऋग्वेद गंधारने श्रावण महिन्यातील दुसऱ्या रविवारी दि. २७ ऑगस्ट रोजी कल्याणमधील प्रतिष्ठित मुरलीधर संगीत विद्यालयाच्या सभागृहात श्रावण सरी या संगीतमय पहिल्या वहील्या कार्यक्रमाचे आयोजन सायंकाळी ०५.३० ते ०७.३० यावेळेत करण्यात आले. या कार्यक्रमात पाऊस, श्रावणमास या विषयावरील हिंदी / मराठी गाणी, कविता विविध सदस्यांनी उत्कृष्टरीतीने सादर केल्या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सौ.भारती कुलकर्णी, श्री. रविंद्र कुलकर्णी व अधिवक्ता श्री मंदार कुलकर्णी या कुलकर्णी त्रयींनी अप्रतिम केले. श्री.अनिकेत ब्रम्हे यांनी तबला साथ देऊन बहार आणली. या कार्यक्रमास दर्दी सभासद, हितचिंतक बहुसंख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमास मुरलीधर संगीत विद्यालय संचालकांनी आवश्यक सोयी सहीत सभागृह अगदी माफक दरात उपलब्ध करुन दिले. आयोजक व रसिक प्रेक्षकांनी संगीताबरोबर चहापानाचा आस्वाद घेत समारोप केला. कार्यक्रमाच्या समारोपानंतर मुरलीधराची आरती करण्यात आली. देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ, कल्याण, पदाधिकारी, सदस्य, हितचिंतक, व मित्र परिवार यांच्या संकल्पनेतून अधिक श्रावण पुरुषोत्तम मासाच्या निमित्ताने आपल्या परिसरातील गरजु आधाराश्रम/ब्राह्मण/ नागरिक यांच्यासाठी अन्नदान निधी जमा करुन त्यांतून आधारवड, कल्याण पश्चिम व मैत्रीकुल संस्था, बाबगांव या दोन संस्थाना तसेच ११ गरजू ब्रह्मवृंद/नागरिकांना पुरेसे अन्नधान्य शिधा रूपात वाटप या आठवड्यात करण्यात आले. त्यांसाठी रविवारी सकाळी मैत्रीकुल संस्थेस संस्था



पदाधिकारी/सदस्य/हितचिंतक यांनी सदिच्छा भेट देऊन तेथील परिस्थिती व विद्यार्थी जीवन अनुभवले. या सर्व अन्नदान निधी संकलनात अनेक दानशुरांचे हातभार लागला, त्यासाठी सर्वांचे हार्दिक आभार. असाच हा प्रकल्प पुढे चालू ठेवण्याचा संस्थेचा मानस आहे.

**बडोदे** : बडोदे देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मंडळाचे एकूण २४ जण श्री क्षेत्र गरुडेश्वर श्री दत्त मंदिर व स्वामी वासुदेवानंद ह्यांच्या समाधिस्थान अश्या पवित्र स्थानावर श्रावणीला उपस्थित होते सकाळी ९ वाजता कार्यक्रम श्री मकरंद रायकर गुरूजी च्या मार्गदर्शना खाली सुंदर श्रावणी झाली त्यात विशेषतः नर्मदा नदीत जाऊन भष्म स्नान तर्पण वगेरे केले फराळ, काढा आणि २ वाजता महाप्रसादाचा लाभ सर्वांनी घेऊन ५ वाजता सगळे आनंदात घरी आले संस्थे कडून गरुडेश्वर संस्थेला फुल नाही तर फुलांची पाकळी म्हणून रुपये ५००१/- अन्नदान साठी देणगी पण दिली सर्व व्यववस्थापक, गुरुजी व तिथले सर्व कार्यक्रतांचे आभार मानले.

**मुलुंड** : प्रतिवर्षी प्रमाणे यंदाही देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संस्था मुलुंड (पूर्व) तर्फे सर्व ज्ञातीतील ब्राम्हणांसाठी श्रावणीचे आयोजन सोमवार दिनांक २१-८-२०२३ रोजी सकाळी ८ वाजता संस्थेच्या सभागृहात करण्यात आले होते. वेदमूर्ति नारायण वझे व त्यांचे शिष्य यांनी होम-हवन केले. एकूण २० ब्राह्मण सहभागी झाले होते. साबुदाणा खिचडी व काफी असा अल्पोपहार सगळ्यांना देण्यात आला.कार्यक्रम अतिशय छान झाला.

❊ देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संस्था, मुलुंड तर्फे अधिकमासानिमित्त रविवार दिनांक १३-८-२०२४ रोजी सकाळी श्री.सत्यनारायण महापूजा आणि संध्याकाळी ह.भ.प. भक्ती समुद्र यांचे सुश्राव्य कीर्तन, स्नेहभोजन आयोजित करण्यात आले होते. संस्थेचे जेष्ठ सदस्य व माजी कोषाध्यक्ष श्री. सुभाष जोशी व त्यांच्या पत्नी सौ. शुभांगी जोशी यांच्या हस्ते श्री.सत्यनारायण महापूजा संपन्न झाली.त्यावेळी कार्यकारिणी मंडळाचे सदस्य, विश्र्वस्त मंडळाचे सदस्य व काही सभासद उपस्थित होते.त्याचप्रमाणे मध्यवर्ती मंडळाचे अध्यक्ष श्री.विलास जोशी, कार्याध्यक्ष श्री प्रभाकर कुलकर्णी, समाचारचे संपादक श्री.मिलिंद सरदेशमुख आर्वजून उपस्थित होते.सर्वांना तीर्थप्रसाद देण्यात आला. संध्याकाळी ५ वाजता ह.भ.प.भक्ती समुद्र यांचे सुश्राव्य कीर्तन आयोजित करण्यात आले होते.डॉ.सौ.प्रेरणा क्षीरसागर (महिला शाखा अध्यक्ष) यांनी त्यांचे स्वागत केले.भक्ती समुद्र यांनी आपल्या कीर्तनात नामस्मरणाचे महत्त्व सांगितले.त्याचप्रमाणे देव भक्तांच्या भक्तीवर प्रसन्न होऊन कशी तो स्वतः भक्तांची सेवा करतो हे श्री.एकनाथ महाराजांचा कथेतून उलगडून दाखवले.त्यांनी काही भक्ती गीते सादर केली.कीर्तनाची सांगता आरतीने झाली.

**संभाजीनगर** : देशस्थ ऋग्वेदी ब्राम्हण समाज मंडळ संभाजी नगर आयोजित प्रति वार्षिक ऋक श्रावणी उपाकर्म विधी उपक्रम वर्ष ०३ रे सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते, स्वर्गीय शंतनू चौधरी सरांच्या प्रेरणेने आणि श्री. अमोल पांडव यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी प्रमाणे वर्षी या उपक्रमाला खूप छान प्रतिसाद मिळाला. तसेच याही वर्षी मंडळाने केलेल्या आव्हानाला ५५ ते ६० सदस्यांनी सहभाग नोंदविला. या उपक्रमाचे प्रकल्प प्रमुख म्हणून श्री. नरेश पटवर्धन, श्री. मिलिंद दाभाडकर यांनी काम यशस्वीरित्या पार पाडले. तसेच मंडळाचे अध्यक्ष श्री. नरेश जोशी, उपाध्यक्ष रवी जेऊरकर, सचिव श्री. अनंत कुलकर्णी, कोषाध्यक्ष श्री. अंबादास कुलकर्णी, कार्यकारिणी सदस्य श्री. श्रीपाद मुगुटे, श्री. वैभव देशपांडे, पदाधिकारी श्री. प्रशांत दाभाडकर, तसेच महिला अध्यक्षा मोनिका शंतनू चौधरी, कार्यकारिणी सदस्य मयुरी दाभाडकर, महिला पदाधिकारी सौ. कल्पना जोशी, सौ. योगिनी देशमुख, सौ. उत्कर्षा पारनेरकर, सौ. सीमा कस्तुरे, सौ. विभा देशपांडे या सर्वांच्या सहकार्याने कार्यक्रम संपन्न झाला.

❊ देशस्थ ऋग्वेदी ब्राम्हण समाज मंडळ आणि कुलस्वामिनी प्रतिष्ठान आयोजित माझा बाप्पा हा शाडू माती पासून गणपती बनवण्याची कार्य शाळा घेण्यात आली. या उपक्रमास प्रशिक्षक म्हणून राजा रवी वर्मा

कॉलेजचे प्राध्यापक श्री. श्रीकांत कडेपूरकर सरांचे मार्गदर्शन लाभले, तसेच प्रमुख पाहुणे म्हणून मुंबई ऑन्को केअर सेंटरचे डॉ. प्रकाश देवडे सर, तसेच कुलस्वामिनी प्रतिष्ठानचे श्री. विलास कोरडे सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या उपक्रमात वयोगट ४ ते ७४ वयोगटातील जवळपास ८० लोकांनी सहभाग नोंदवत खूप छान प्रतिसाद दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. चित्रा देशमुख यांनी केलेले तसेच हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी उपक्रमाचे प्रकल्प प्रमुख नरेश जोशी, सीमा कस्तुरे, उत्कर्षा पारनेरकर, रुपाली कुलकर्णी, मोनिका शंतनू चौधरी, योगिनी देशमुख यांनी काम पाहिले. तसेच मंडळाचे अनंत कुलकर्णी, श्रीपाद मुगुटे, नरेश पटवर्धन, वैभव देशपांडे, गोपाल कुलकर्णी, प्रशांत दाभाडकर, मिलिंद दाभाडकर, विभा देशपांडे, कल्पना जोशी, रचना चौधरी यांच्या सहकार्याने कार्यक्रम संपन्न झाला.

**कऱ्हाड** : आज दिनांक २१/८/२३ वार सोमवार रोजी देशस्थ ऋग्वेदी ब्राम्हण संघ कराड व श्रीधर स्वामी आश्रम ट्रस्ट कराड यांचे संयुक्त विद्यमाने श्रावणी कार्यक्रम आयोजित केला होता तो अत्यंत उत्साहात पार पडला. सर्वांना श्री गोविंद घळसासी गुरुजी यांचे मार्गदर्शन मिळाले .अत्यंत मंगलमय वातावरणात साधारण २८ जणांनी कार्यक्रमात सहभाग घेतला. उपहारासाठी आपल्या संघाने शाबुदाण्याची खिचडी, राजगिरा लाडू, केळ, आणि मसाला दूध अशी सुंदर व्यवस्था केली होती.

**सोलापूर** : देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्था सोलापूर या संस्थेचा ९४ वा वर्धापन दिन आणि अधिक मास या निमित्ताने संस्थेच्या रामदास संकुल सभागृहात पुरुषोत्तम याग करण्यात आला. या यागाचे यजमानपद सोलापुरातील सात जोडप्यांनी स्वीकारले होते. यामध्ये संस्थेचे उपाध्यक्ष विजय कुलकर्णी, कोषाध्यक्ष सतीश पाटील, श्रीपाद दीक्षित, भरत काटीकर, अनिल देशपांडे, शरद भट, मोहन मोकाशी यांचा सहभाग होता.



Protect Capital & Create Wealth.....
JAYANT DESHMUKH
B.COM. CAIIB DBM
Insurance & Investment Consultant
LIC (MDRT 2020) Mediclaim, Health Insurance & Mutual Fund
M. : 9930445721 / 9702837022
Email : deshijayant5@gmail.com

Off. : 106, Shrivatsam, First Avenue Business Park, Durgadi Chowk, Kalyan West - 421201
Resi. : Shree Ram Tower, Near Jain Society, Kalyan (West) 421301

LIC भारतीय जीवन बीमा निगम LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA

- Joint Treasurer - Deshastha Rugvedi Brahman Sangha, Kalyan
- Manager - Laxmi Narayan Vadhu-Var Suchak Kendra, Kalyan
- Member - Brahman Business Network Group, Kalyan
- Past Manager, State Bank of India
- Director - MPFC Udyog Nidhi Ltd., Kalyan
- Trustee, Balaji Mandir Trust, Kalyan
- General Secretary, Karnataka Sangha, Kalyan
- Past Vice President, Andhra Association, Kalyan
- Prudent Partner - Mutual Fund Distributor / Company Deposit / Insurance

Get Insured... & Be Secured....

STAR Health Insurance Personal & Caring
The Health Insurance Specialist

यावेळी जयंत तुळजापूरकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी पौरोहित्य केले. त्यांना संस्थेचे कार्यवाह श्याम जोशी सहकार्य केले. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष दत्ता आराध्ये, वेद प्रतिष्ठानचे गोविंद गवई, रवींद्र तुळजापूरकर, रंगनाथ जोशी युवक शाखा अध्यक्ष सुशांत कुलकर्णी, महिला अध्यक्षा हेमा चिंचोळकर, सहकार्यवाह प्रा. डॉ. नभात काकडे, श्रीपाद परळीकर, प्रकाश आलाट उपस्थित होते.

✻ देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्था, सोलापूर. या संस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त दिनांक ०५ ऑगस्ट, शनिवार रोजी सायंकाळी सहा वाजता, लोकमान्य टिळक सभागृह (ॲम्फी थिएटर), हिराचंद नेमचंद वाचनालय सोलापूर, येथे संस्थेच्यावतीने प्राणसई या पावसाळी कवितांवर आधारित कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम अक्षय उजापूरकर, उर्मी कुलकर्णी (कथक नृत्य), जयेश कुलकर्णी (बासरी वादन) यांनी सादर केला. अक्षयरसिक प्रस्तुत, अभिव्यक्त तरंग प्राणसई हा पावसाळी कवितांवर आधारित झालेल्या कार्यक्रमात उर्मी कुलकर्णी यांचे कथ्थक नृत्य आणि जयेश कुलकर्णी यांच्या बासरी वादनाच्या जुगलबंदीवर रसिक श्रोते मंत्रमुग्ध झाले या कार्यक्रमात अक्षय आणि रसिका यांनी विविध पावसाळी कविता सादर केल्या या कवितांनाही रसिक श्रोत्यांची दाद मिळाली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष डॉक्टर श्रीकांत बेळगावकर यांनी केले तर कलावंतांचा सत्कार उपाध्यक्ष दत्तात्रय आराध्ये महिला अध्यक्ष हेमा चिंचोळकर, उपाध्यक्ष विजय कुलकर्णी, कोषाध्यक्ष सतीश पाटील यांनी केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यवाह श्याम जोशी यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यकारणी सदस्य रवींद्र तुळजापूरकर, रंगनाथ जोशी डॉ. नभा काकडे आदींनी परिश्रम घेतले. वर्धापन दिनानिमित्त यावेळी उपस्थित त्यांना पेढे वाटप करण्यात आले.

✻ **युवक अध्यक्षांचा सत्कार** : सोलापूर युवक शाखेचे अध्यक्ष सुशांत कुलकर्णी यांनी पाहिजे जातीचे या चित्रपटांमध्ये सुप्रसिद्ध कलाकार सयाजी शिंदे यांच्या समवेत भूमिका साकारली आहे. त्याबद्दल सोलापूरचे उद्योगपती दत्ताअण्णा सुरवसे यांच्या हस्ते या कार्यक्रमात त्यांचा सत्कार करण्यात आला.

## अभिप्राय

मा. कार्यकारी संपादक साहेब,
मध्यवर्ती मंडळ, मुंबई.
महोदय,

मी गेल्या अनेक वर्षांपासून नासिक संस्थेमध्ये कार्यरत असुन अनेक वेळेस मध्यवर्ती मंडळात येण्याचा योग आला आहे. स्व. मधुकाका कुलकर्णी हे अध्यक्ष असतांना येणेजाणे अधिकच वाढले. काकांनी पण मध्यवर्ती संस्थेला प्रगतीपथावर नेण्याचे काम केले. गेल्या काही दिवसांपासुन माझ्या घरी आपल्या संस्थेचा अंक येतो. त्यात असलेली माहिती, गुणवत्ता, वेळेनुसार प्रथम पानावरील फोटो हे निश्चितच कौतुकास्पद आहे. याचे श्रेय कार्यकारी संपादकांना तर आहेच पण आपल्या अध्यक्षांना देखील आहे. त्याबद्दल प्रथमतः त्यांचे अभिनंदन. अंकात येणारे मजकुर, माहीती ही पण उपयुक्त आहे. फक्त एक खंत वाटते की आपले युवक थोडेसे समाजापासुन दुर गेले आहेत याला आपण पालक पण थोडेफार जबाबदार आहोत, त्यांना या संस्थेच्या कार्यात आणण्यासाठी काही करता आले तर समाज आणि संस्था वाढीच्या दृष्टीने फायद्याचे होईल आणि या कार्यात मी पण खारीचा वाटा उचलण्यास तयार आहे. पुनश्च एकदा अंकाच्या संपादकांचे अभिनंदन आणि सर्व मान्यवरांना नमस्कार.

**अजय श्रीहरी चौधरी** (नाशिक)

# मध्यवर्ती संस्थेस रुपये एक लाखाची देणगी



देणाऱ्याने देत जावे घेणाऱ्याने घेत जावे, घेता घेता एक दिवस देणाऱ्याचे हात घ्यावे.

अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती संस्थेकडून मला गरज होती तेव्हा झालेली मदत मला कायम लक्षात होती, आपण सुद्धा एक दिवस अशीच मदत कोणाला तरी करावी असे स्वप्न होते ते आज खरे ठरले. प्रत्येकाने फुल नां फुलाची पाकळी मध्यवर्ती संस्थेच्या सामाजिक व शैक्षणिक कार्यात मदत करावी योगदान द्यावे असे वाटते कारण आपण केलेली छोटीसी मदत ही एखाद्या गरजू माणसाला खूप मोठी ठरू शकते हे उद्‌गार आहेत औरंगाबाद येथून पुणे येथे नोकरी निमित्ताने स्थायिक झालेल्या तरुणीचे. आय टी क्षेत्रात काम करणाऱ्या तरुण दामप्त्याचे. या दानशूर दांपत्याचे नाव आहे श्री. स्वप्नील जवळेकर व सौ. भाग्यश्री सावकार जवळेकर. यांनी रुपये एक लाख ची देणगी शैक्षणिक कार्यासाठी मध्यवर्ती संस्थेस दिली आहे.

श्री. स्वप्नील व सौ. भाग्यश्री यांचे मध्यवर्ती संस्था आभार व्यक्त करीत आहे.

# श्रावणी

श्रावण शुक्ल पंचमी (नागपंचमी) किंवा श्रावण पौर्णिमा (नारळी पौर्णिमा) या दिवशी श्रावणी सर्वत्र होत असते. श्रावण महिना हा हिंदू पंचांगानुसार आणि भारतीय सौर दिनदर्शिकेनुसार वर्षातला पाचवा महिना आहे.

या महिन्याच्या पौर्णिमेला चंद्र श्रवण नक्षत्रात असतो. त्यावरून या महिन्याला श्रावण असे नाव मिळाले आहे. श्रावण महिन्याला सर्व व्रतांचा / सणांचा राजा म्हटले जाते. श्रावण महिन्यातील प्रत्येक वारी कोणत्याना कोणत्या देवतेची पूजा वा व्रत करण्याची परंपरा आहे. नारळी पौर्णिमा हा सण हिंदू वर्षातील श्रावण महिन्यातील पौर्णिमेच्या दिवशी साजरा केला जातो. याच दिवशी श्रवण नक्षत्र असल्याने ब्राह्मण पुरुष उपाकर्म करून नवीन यज्ञोपवीत धारण करतात. या विधीला श्रावणी असे नाव आहे. श्रावणी ही श्रावण पौर्णिमेलाच करतात असे नाही. श्रावणी हस्त नक्षत्रात चंद्र असताना श्रावण शुक्ल पंचमीलाही असू शकते. पौर्णिमेला चंद्रग्रहण असल्यास श्रावण पौर्णिमेला श्रावणी नक्कीच करत नाहीत. ऋग्वेद्यांची श्रावणी ऋ.क. श्रावणी, युजुर्वेद्यांची श्रावणी यजु श्रावणी, तैत्तिरीय शाखा व तिच्या अंतर्गत येणाऱ्या हिरण्यकेशी उपशाखेच्या ब्राह्मणांची हिरण्यकेशी श्रावणी या वेगवेगळ्या दिवशी असतात. तामिळ पंचांगाप्रमाणे श्रावणी पौर्णिमेच्या दिवशी अवनी नावाचा तामिळ महिना चालू असतो, म्हणून या दिवसाला तामिळ पंचांग पाळणारे लोक अवनी अवित्तम म्हणतात. अवित्तम म्हणजे धनिष्ठा. दुसऱ्या दिवशीच्या पौर्णिमेला चंद्र धनिष्ठा नक्षत्रात असतो. जर पौर्णिमा लागोपाठ दोन दिवस असेल तर पहिल्या दिवशी ऋग्वेदी ब्राह्मणांची आणि दुसऱ्या दिवशी यजुर्वैदी ब्राह्मणांची श्रावणी असते. सामवेदी ब्राह्मणांची श्रावणी गणेश चतुर्थीला असते.

श्रावण हा शिवपूजनासाठी अतिशय महत्त्वाचा आणि पवित्र महिना मानला जातो. श्रावण महिन्याला सर्व व्रतांचा / सणांचा राजा म्हटले जाते. श्रावण महिन्यातील प्रत्येक वारी कोणत्या ना कोणत्या देवतेची पूजा वा व्रत करण्याची परंपरा आहे. या विशिष्ट महिन्यात केल्या जाणाऱ्या शंकराच्या उपासनेला हिंदू धर्मात विशेष महत्त्व आहे. प्रत्येक सोमवारी महादेवावर वाहिल्या जाणाऱ्या शिवामूठीचे महत्त्वही वेगळे आहे.

पहिल्या सोमवारी तांदूळ, दुसऱ्या सोमवारी तीळ, तिसऱ्या सोमवारी मूग, चौथ्या सोमवारी जवस आणि पाचव्या सोमवारी शिवामूठ म्हणून सातू वाहण्याची परंपरा आहे. श्रावण सोमवारी उपवास ठेवून महादेवाची मनोभावे पूजा केल्याने मनातील सर्व इच्छा पूर्ण होतात. आयुष्यातील सर्व कष्ट दूर होतात. भगवान शिव आणि माता पार्वती यांची एकत्र पूजा केल्याने सौभाग्य लाभते आणि आर्थिक समस्या दूर होतात अशी मान्यता आहे.

## भावपूर्ण श्रद्धांजली



प्राचार्य अनंत मनोहर सुरु (पुणे) यांचे वृद्धापकाळाने दि. १०.०९.२०२३ रोजी दुःखद निधन झाले. प्राचार्य अनंत मनोहर सुरु हे अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाचे माजी सचिव, शिक्षण प्रसारक मंडळाचे माजी अध्यक्ष, वाढीया कॉलेजचे माजी प्राचार्य, लक्ष्मी नरसिंह देवस्थानचे माजी मुख्य विश्वस्त यांचे दिनांक १०.०९.२०३ रोजी दुःखद निधन. संस्थेच्या हिताचे अनेक निर्णय आणि सभासद वाढीचे प्रयोग श्री. सुरु यांनी केले होते. ज्ञातीतील लोकांना एकत्र आणण्याचे आणि संस्कारक्षम कार्यक्रम आयोजित करण्यात सुरु यांचा वाटा सिंहाचा होता. स्व. प्राचार्य अनंत मनोहर सुरु यांच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. त्यांच्या आत्म्यास चिरकाल शांती व सद्‌गती देवो ही श्री लक्ष्मी नरसिंह चरणी प्रार्थना. भावपूर्ण श्रद्धांजली.


## अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ

**अद्यावत नूतनीकरण केलेली सर्व सोयींनी उपलब्ध अशी दादर - माहीम विभागातील**

**खालील मंगल कार्यालये**

**तळमजल्यावरील वातानुकूलीत सर्व अद्यावत सोयीयुक्त सभागृह. दुसऱ्या मजल्यावरील अद्यावत सोयीयुक्त सभागृह. वधू-वरांसाठी प्रशस्त खोल्या, स्वयंपाकासाठी प्रशस्त किचन मंगलकार्य ठरताच प्रथम खालील ठिकाणी चौकशी करून कार्यालय राखून ठेवा. सोसायटीच्या सभा, संगीताचे कार्यक्रम, चर्चासत्रे, परिसंवाद, नाट्य-तालीम, संमेलन ह्यासाठी पण उपलब्ध**

## अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ

**लक्ष्मीनारायण बाग, बाळ गोविंददास मार्ग, माहीम, मुंबई - ४०० ०१६.**

**दूरध्वनी : २४३०२२७३/२४३०७५७६ Email : aadrbm@gmail.com**

# SHRI YASH TOURS

Central Railwaymen Society,
Plot No.41, Kalyan Road,
Dombivli (E) 421 201
Maharashtra State

आयोजक - श्रीकांत पाटसकर CELL : 9819148002

SPECIALIZED : PACKAGED TOURS ALL OVER INDIA INSTANT HOTEL BOOKING TOURS ALL OVER INDIA & SOUTH EAST ASIA, AIR TICKETS
E-Mail : shriyashtours04@gmail.com

## कौटुंबिक वातावरणात दर्जेदार सहली

| | |
|---|---|
| स्टॅच्यू ऑफ युनिटी, बडोदा, गरूडेश्वर व पोयचा ( स्वामी नारायण मंदिर) | ऑक्टो. ८ नोव्हेंबर ६ — ३ रात्र<br>खर्च प्रत्येकी रू. १३,००० + रेल्वे |
| राजस्थान, (मारवाड) , जयपुर, जोधपूर, जैसलमेर, बिकानेर | ऑक्टोबर २९ — ६ रात्र<br>खर्च प्रत्येकी रू. ३०,५०० + विमान |
| मदुराई, कोडाई केनॉल, तंजावर, रामेश्वर | नोव्हेंबर २४ — ५ रात्र<br>खर्च प्रत्येकी रू. २३,००० + विमान |
| इंदौर, उज्जैन, ओंकारेश्वर, मांडू | नोव्हेंबर १८ — ४ रात्र<br>खर्च प्रत्येकी रू. १६,००० + रेल्वे |
| शृंगेरी, उडिपी, गोकर्ण, मुरडेश्वर | डिसेंबर ८ — ५ रात्र<br>खर्च प्रत्येकी रू. २४,५०० + विमान |
| गुजरात , सोमनाथ, द्वारका, पोरबंदर, गीरनार | जाने. २ ते ७ — ३ रात्र<br>खर्च प्रत्येकी रू. १५,००० + रेल्वे |
| राष्ट्रीय तिर्थक्षेत्र, अंदमान, सेल्युलर जेल, बारटंगा, हॅवलॉक, रॉस, आयलंड | जाने. ९ — ५ रात्र<br>खर्च प्रत्येकी रू. ३१,००० + विमान |
| पिठापुर (श्रीपाद श्रीवल्लभ जन्मठिकाण) भुवनेश्वर, जगन्नाथ पुरी, कोणार्क | जाने. २५ — ५ रात्र<br>खर्च प्रत्येकी रू. २३,००० + विमान + रेल्वे |

# जोडीदार निवडा

**वर पाहिजे.....................................................................................................**

● **कु. अपूर्वा मोहन बहिरट**. ब्राह्मण पोटशाखा : देशस्थ ऋग्वेदी, भ्रमणध्वनी ९८७०७१४७३०, ९८७०७५७००४, पत्ता : कांदिवली, मुंबई, जन्म तारीख/वेळ : ११.०७.१९९३, सकाळी ११.३५, जन्मस्थळ : नाशिक, उंची : ५ फूट, गोत्र : बादरायण, रास : मीन, नक्षत्र : रेवती, चरण : १, गण : देव, नाडी : अंत्य, मंगळ : नाही, वर्ण : गहू वर्ण, बांधा : मध्यम, शिक्षण : B.Com, नोकरी व ठिकाण : मुंबई, हुद्दा (पोस्ट) : Sr. Accountant Executive, अपेक्षा : प्रथमवर, उंची ५ फूट ४ इंच ते ५ फूट ८ इंच. मुंबई पुणेस्थित प्राधान्य, कोणत्याही शाखेचा पदवीधर, स्वतःचे घर असावे, निर्व्यसनी, समंजस, मनमिळावू.

● **श्रुती श्रीपाद देशपांडे** ब्राह्मण शाखा : देशस्थ, गोत्र : काश्यप, जन्म दिनांक : २७.११.१९९३, जन्म वेळ : सायं. ०७.३५, जन्म स्थळ : खोपोली, उंची : ५.४, नाडी : मध्य, रास : मेष, शिक्षण : Msc (Botany), नोकरी / व्यवसाय : --, रक्तगट : $A^+$, वार्षिक उत्पन्न : --, अपेक्षा : पदवीधर, कोणत्याही पोटशाखेचा, गाव / शहर : अंबरनाथ (पूर्व), संपर्क क्र. : ८८०५९५८३६९.

● **रुचा अनिल कुलकर्णी** ब्राह्मण शाखा : देशस्थ ऋग्वेदी, गोत्र : भारद्वाज, जन्म दिनांक : ०६.०१.१९९४, जन्म वेळ : स. ०५.३०, जन्म स्थळ : पुणे, उंची : ५.३, नाडी : मध्य, रास : तुळ, शिक्षण : Computer Engineer, B.E., नोकरी / व्यवसाय : खासगी, सातारा, रक्तगट : $A^+$, वार्षिक उत्पन्न : १०,००० मासिक, अपेक्षा : स्वः शाखेचा, इंजिनियर, स्वःताचे घर, गाव / शहर : सातारा, संपर्क क्र. : ९८२३६३८९६२ / ८३५६८१९३७५.

● **वैदेही रविशंकर केसकर** ब्राह्मण शाखा : देशस्थ ऋग्वेदी, गोत्र : विश्वमित्र, जन्म दिनांक : २४.०२.१९९४, जन्म वेळ : स. ०८.१५, जन्म स्थळ : कल्याण, उंची : ५.४, नाडी : मध्य, रास : कर्क, शिक्षण : BE Civil, M.A. Psychology, नोकरी / व्यवसाय : Arya Gurukul Counsilor, रक्तगट : $O^+$, वार्षिक उत्पन्न : २,४०,०००, अपेक्षा : ब्राह्मण, उच्चशिक्षित, चांगले घराणे, पत्रिका जुळायला हवी, गाव / शहर : कल्याण (प.), संपर्क क्र. : ८०९७८८३८४० / ९८२०७०९४७०.

● **दर्शना विवेक भावे** ब्राह्मण शाखा : शुक्ल यजुर्वेदि, गोत्र : भार्गव, जन्म दिनांक : १२.०३.१९९४, जन्म वेळ : दु. ०३.२०, जन्म स्थळ : औरंगाबाद, उंची : ५.१, नाडी : आद्य, रास : कुंभ, शिक्षण : BDS, नोकरी / व्यवसाय : Assistant dr. in Sindhesh dental Clinic, रक्तगट : $A^+$, वार्षिक उत्पन्न : २५,००० मासिक, अपेक्षा : निर्व्यसनी, शाकाहारी, सुसंस्कृत, Medical field, गाव / शहर : कल्याण (प.), संपर्क क्र. : ९८९२१७७०९६ / ९७०२७१८८५०.

**वधू पाहिजे.....................................................................................................**

● **अमोल किशोर कावळे.** जन्मतारीख - ०१.०८.१९९२, जन्म वेळ - सकाळी ५.३०, जन्म ठिकाण - कर्जत, ब्राह्मण शाखा - देशस्थ ऋग्वेदी, गोत्र - भारद्वाज, रास - सिंह, गण - मनुष्य, नक्षत्र - पूर्वा फाल्गुनी, नाडी - मध्य, उंची - ५.८, रक्तगट- O+, शिक्षण - M.Com in Accounts, नोकरी - ठाणे, Business Process Lead, वार्षिक उत्पन्न - ७.५० लाख, अपेक्षा - पदवीधर, नोकरी किंवा व्यवसाय, शाकाहारी, संपर्क - ९८२०८८३३४३/९०२९६६६११०.

● **ओंकार प्रकाश ढवळे.** जन्मतारीख - २४.०६.१९९१, जन्म ठिकाण - ठाणे, ब्राह्मण शाखा - कऱ्हाडे ब्राह्मण, गोत्र - वशिष्ठ, गण - मनुष्य, उंची - ५.७, वर्ण - गोरा, रक्तगट - AB+, शिक्षण - B.Com, LLB, नोकरी/व्यवसाय - पूर्ण वेळ शेअर मार्केट ट्रेडींग, मासिक उत्पन्न - ३ लाख, अपेक्षा - नोकरी करणारी, सुस्वरुप, मनमिळावू, संपर्क - ९००४६९६९८०.

● **देवेश रामचंद्र कुळकर्णी** ब्राह्मण शाखा : देशस्थ ऋग्वेदी, गोत्र : अत्रि, जन्म दिनांक : २८.१२.१९८७, जन्म वेळ : स. ०६.५८, जन्म स्थळ : भुसावळ, उंची : ५.१०, नाडी : - , रास : मिन, शिक्षण : मॅकेनिकल इंजिनिअर, नोकरी / व्यवसाय : सरकारमान्य ई सेवा केंद्र, मोटर वाहन संबंधित कामे, रक्तगट : -, वार्षिक उत्पन्न : १ ते दिड लाख मासिक, अपेक्षा : कोणत्याही शाखेची पदवी, गाव / शहर : भुसावळ, संपर्क क्र. : ९४२१८७४३२९ / ९६०७७५२२७८.

● **प्रणव अनंत दंडवते** ब्राह्मण शाखा : देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण, गोत्र : वशिष्ठ, जन्म दिनांक : २७.०६.१९९०, जन्म वेळ : ०२.०८, उंची : ५.१०, नाडी : अंत्य , रास : सिंह, शिक्षण : पदवी, BBA व विमान कंपन्यांचा IETA कोर्स, नोकरी / व्यवसाय : पॅकेज टूर्स अरेंज करून देणे, पासपोर्ट, व्हिसा काढून देणे, स्टुडंट एक्सचेंज प्रोग्राम मॅनेज करणे, वार्षिक उत्पन्न : ०५ ते ०६ लाख, अपेक्षा : अनुरुप व नोकरी करणारी असावी, संपर्क क्र. : ७३८५६२१६७८ / ९९२२०८८३७०.




।। संहतिः कार्यसाधिका ।।

# अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ

(सार्वजनिक न्यास नोंदणी क्रमांक - एफ ३९७६)
लक्ष्मीनारायण बाग, बाळ गोविंददास मार्ग, माहीम, मुंबई - ४०० ०१६.
दूरध्वनी : २४३० २२७३ / २४३० ७५७३ ईमेल : aadrbm@gmail.com
संकेत स्थळ : www.adrbmm.in, GST No. : 27AAATA4113E1ZD




संदर्भ :

दिनांक : ०५.०९.२०२३

## अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ


(नोंदणी क्रमांक F3976)

**संस्थेचे कार्यालय :** लक्ष्मीनारायण बाग, बाळ गोविंददास मार्ग, माहीम, मुंबई ४०००१६.
दूरध्वनी : ०२२-२४३०२२७३ / ७५७३ दूतमुद्रण : aadrbm@gmail com संकेतस्थळ : www.adrbmmahim.in


## वार्षिक सर्वसाधारण सभेची अग्रसूचना

अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, माहीम, मुंबई ४०००१६ या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक ३० सप्टेंबर २०२३ रोजी सायंकाळी ठीक ४.०० वाजता, लक्ष्मीनारायण बाग, बाळगोविंददास मार्ग, माहीम, मुंबई ४०००१६ येथे मंडळाच्या सभागृहात आयोजित करण्यात आली आहे, तरी सर्व सभासदांनी सभेस वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती.

### वार्षिक सर्वसाधारण सभेपुढील विषय

१) दिनांक ०८.१०.२०२२ रोजी भरलेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त मंजूर करणे.

२) आर्थिक वर्ष २०२२-२३ या वर्षाची सनदी लेखापालांनी तपासलेली हिशेब पत्रके व ताळेबंद मंजूर करणे.

३) सन २०२३-२४ या वर्षासाठी सनदी लेखापालाची नेमणूक करणे व त्यांचे मानधन ठरविणे.

४) सन २०२३-२४ या वर्षाचे अंदाज पत्रक मंजूर करणे.

५) दि. ०८.१०.२०२२ ते ३०.०९.२०२३ पर्यंतच्या अहवालास मंजूरी

६) गेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत नेमलेल्या घटना दुरुस्ती समितीने सादर केलेल्या घटनेतील बदल, यावर सविस्तर चर्चा करून त्यात आवश्यक ते बदल / फेरफार वार्षिक सर्वसाधारण सभेच्या मान्यतेनुसार मंजूर करून घेणे व त्याप्रमाणे त्याचा मंजूर बदलासहित अहवाल माननीय धर्मादाय आयुक्त यांना सादर करण्यास मान्यता देणे.

७) नवीन कार्यकारणीचा निवडणूकीचा कार्यक्रम ठरविणे.

८) अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळेचे विषय यावर चर्चा करणे.

**दिनांक : ०५/०९/२०२३**

श्री. विलास विनायक जोशी
(अध्यक्ष)

### सूचना

१) आर्थिक वर्ष २०२१-२२ या वर्षाच्या अहवालासंबंधी, हिशेबासंबंधी काही स्पष्टीकरण हवे असेल तर सभेपूर्वी किमान आठ दिवस आधी लेखी स्वरुपात विचारणा करावी. तसे न केल्यास त्या सभासदांस स्पष्टीकरण देण्यास मंडळ बांधील राहाणार नाही.

२) सभासदांनी विषय पत्रिकेतील विषय क्र. २ संदर्भातील कागदपत्रे सभेस येताना बरोबर आणावीत.

३) गणसंख्येच्या अभावी वार्षिक सर्वसाधारण सभा तहकूब झाल्यास तीच सभा अर्ध्या तासानंतर त्याच ठिकाणी होईल व सभेच्या सूचनेतील विषयावरच कामकाज होईल.

*With*
*Best*
*Compliments*
*From*



SE

# SANGRAM ENTERPRISES

**PHARMACEUTICAL DISTRIBUTORS**

**VILAS JOSHI I SANGRAM JOSHI I SOUMITRA JOSHI**

**: Office :**
Apollo, A-3, Basement,
Bajiprabhu Deshpande Marg,
Vishnu Nagar, Naupada,
Thane (West) 400602
Tel. : 25408561 / 25408565

*Best wishes from*

Reg. No. AR9/RSR/UOG/23952/96-97

# SAMARTH
## URBAN CO-OP. CREDIT SOCIETY LTD., BELAGAVI.

Celebrating 25 Years SILVER JUBILEE 1996-2021

**HEAD OFFICE :**
"Samarth Sadan", Gurukrupa complex,
1st Floor, 1513, Maruti Galli, BELAGAVI - 01.
Phone : 0831-2431357, 2403968
e-mail : samarthsociety@yahoo.com
Website : www.samarthsociety.co.in

**R C NAGAR BRANCH :**
"Bhagirathi" R.S. No. 731/D-2,
'C' Scheme, Channamma Nagar,
Main Road, BELAGAVI - 06.
Phone : 0831-2443161

**TILAKWADI BRANCH :**
"Classic Plaza" CTS 44/A2,
Somwarpeth, Tilakwadi,
BELAGAVI - 06.
Phone : 0831-2430357

**SHAHAPUR BRANCH :**
CTS 1103, 1st Floor,
Bichu Galli, Shahapur,
BELAGAVI - 03.
Phone : 0831-2431257

**KHANAPUR BRANCH :**
1524/A6, Mannerikar Building,
Beside State Bank,
Belagavi-Goa Road, KHANAPUR.
Mob. : 6363090655

## UNIQUE DEPOSIT SCHEME WITH ATTRACTIVE RATE OF INTEREST

### AKSHAY DEPOSIT

| | | | Regular | For Senior Citizen |
|---|---|---|---|---|
| 1) | 46 days to 180 days | ... | 6.00% p.a. | -- |
| 2) | 181 days to 364 days | ... | 6.50 p.a. | -- |
| 3) | 1 Year | ... | 8.00% p.a. | 9.00% p.a. |
| 4) | 2 Years | ... | 9.00% p.a. | 10.00% p.a. |
| 5) | 3 Years | ... | 10.00% p.a. | 11.00% p.a. |

**KALPATARU DEPOSIT : Double in 84 Months**

**GOLD LOAN 12.00% p.a.**

### LOAN SCHEMES

| | | | |
|---|---|---|---|
| 1) | Personal Security Loan | ... | 16.00% p.a. |
| 2) | Mortgage / Hypothecation / Business / Cash Credit / Govt. Security / Education Loan | | |
| | * Up to Rs. 10 Lakhs | ... | 14.25% p.a. |
| | * Above Rs. 10 Lakhs & upto Rs. 25 Lakhs | ... | 14.50% p.a. |
| | * Above Rs. 25 Lakhs upto Rs. 50 Lakhs & Above | ... | 15.00% p.a. |

### NIRANTAR (Recurring Deposit)

| | | |
|---|---|---|
| 1) | 1 Year | 8.00% p.a. |
| 2) | 2 Years | 9.00% p.a. |
| 3) | 3 Years | 10.00 p.a. |

### MADHU SANCHAY (Pigmy Deposit)

| | | |
|---|---|---|
| 1) | 6 Months | 3.00% p.a. |
| 2) | 1 Year | 4.00% p.a. |



**Ajay A. Sunalkar**
Chairman

### BOARD OF DIRECTORS

Ganapat A. Kulkarni
Abhay V. Joshi
Sou. Sunanda C. Altekar
Anil V. Bhandari
Umesh Sunagar
Vinayak G. Joshi
Pradeepkumar G. Kulkarni
Sou. Chaya N. Joshi
Parashuram M. Kamble
Ashok H. Pujeri



**Suhas R. Kulkarni**
Vice Chairman

Arvind S. Kulkarni (Secretary)

Raghavendra S. Kesnur (Gen. Manager)

**R.N.I. 16775/68 Regd. No. MCW-126/2021-23,** Published on 15th of every month. Posted at MUMBAI PATRIKA CHANNEL SORTING OFFICE, GPO, Mumbai - 400 001 on, 15th Day of every month.

## दे. ऋ. ब्रा. संस्थेचा
## वर्धापन दिन




Printed and Published by MILIND MALHARRAO SARDESHMUKH on behalf of AKHIL DESHASTHA RUGVEDI BRAHMAN MADHYAWARTI MANDAL,Printed at GURUKRUPA, 03, ROSSARY BUILDING, M M C ROAD, MAHIM (WEST), MUMBAI 400 016 and Published from AKHIL DESHASTHA RUGVEDI BRAHMAN MADHYAWARTI MANDAL, LAXMI NARAYAN BAUG, BAL GOVINDAS MARG, MAHIM, MUMBAI 400 016. Editor : MILIND MALHARRAO SARDESHMUKH